‘पेण’.  रायगड जिल्ह्यातले मुंबई गोवा हायवे वरचे एक छोटेसे गाव. लाखाच्या आतील लोकवस्तीचे. मुंबई पासून जेमतेम ८० किमी अंतरावर. मुंबईच्या नागरी सुधारणा सुविधांपासून आणि cosmopolitan झगमगाटापासून चार हात लांबच राहिलेले. अशा ह्या पेण मध्ये जरा वेगळा विचार करू पाहणारी चार पाच कुटुंबं एकत्र आली. त्यातली काही जणं ठाण्याच्या वेधला जाऊन भारून आलेली. तर काही जण डॉ नाडकर्णींच्या लिखाणामुळे वेधशी परिचित असलेली. काही शाळा आणि क्लास च्या माध्यमातून मुलांना वेगळे काही तरी देऊ पाहणारी. ठाणे, पुणे, वगैरे शहरांपेक्षा पेणची मानसिकता वेगळी खरी. पण तरीही काहीतरी चांगले आणि आपल्या पुढच्या पिढीसाठी उपयुक्त असे काहीतरी करायला हवे असे सगळ्यांनाच मनातून वाटतं. तेव्हा काही झाले तरी वेध आपल्याही शहरात घ्यायचाच अशा इर्षेने सगळेच जण आता रिंगणात उतरले. त्यातूनच जन्म झाला तो क्षितिज ह्या संघटनेचा, नव्हे संरचनेचा. मुलांसाठी, त्यांच्या पालकांसाठी, आणि नवीन शिकण्याची आस असलेल्या सगळ्यांसाठी विविध ज्ञानरंजनाचे कार्यक्रम घेणे हे मुख्य उद्दिष्ट. कोणत्याही राजकीय,धार्मिक, किंवा शैक्षणिक संस्थेचे पाठबळ नसलेले ,आणि म्हणूनच स्वयंप्रेरणेने काम करणारी, ‘ना नफा ना तोटा’ तत्वा वर उपक्रम राबवणारी संस्था.

वेध ची संकल्पना लोकांनाही कळावी ह्या दृष्टीने इतरही कार्यक्रम डॉ नाडकर्णी ह्यांनी सुचवले. त्यातला पहिला होता पालक शाळा. मुलांबरोबरचा संवाद अधिक चांगला कसा करावा, आणि त्यांच्या समस्यातून कसा मार्ग काढावे, हयाविषयी IPH ठाणे मधील सुरभि नाईक, अरुण नाईक आणि रजनी करंदीकर ह्या टीमने पालकांना समुपदेशन केले. कधी वाचनाबद्दल आवड निर्माण करायला ‘वाचू आनंदे’ सारखा कार्यक्रम ‘वयम’ मासिकासोबत घेतला, तर कधी करीयर बद्दल जागरूकता यावी म्हणून स्पर्धा परीक्षांची माहिती सांगणारी सत्रं ठेवली. ‘अस्मि’ कार्यक्रमामध्ये मुलींना ‘स्व’ स्वीकाराची गुरुकिल्ली  दिली ती डॉ सुखदा चिमोटे ह्यांनी. मात्र पेणकरांसाठी पर्वणी ठरला तो शिवजयंतीचा कार्यक्रम॰ शिवाजी महाराजांच्या ‘आग्र्याहून सुटका’ ह्या पर्वाच्या माध्यमातून आजच्या काळातले आपत्तिनियोजन डॉ नाडकर्णी यांनी अत्यंत रंजकपणे सादर केले. तेव्हाच त्यांनी वेध २०१७ चे सुतोवाचही केले.

‘वेगळ्या वाटा’ ही संकल्पना देखील डॉ नाडकर्णी ह्यांनी सुचवली आणि सगळ्यांनीच उचलून धरली. त्याचे गीतही थोड्याच दिवसात बसले.

इतर मुलं आणि शाळांपर्यंत पोचण्यासाठी निबंध स्पर्धा घेतली. त्या निमित्ताने मुलांना करीयर, आपली स्वप्नं, आणि नवीन तंत्रज्ञान  ह्या विषयांवर लिहिते केले. पेण मधल्या सर्व  शाळा आणि आसपासच्या आश्रमशाळा  आणि नागोठण्यातल्या अनेक शाळांनी ह्यात भाग घेतला. वेध साठी समूहगीते म्हणायला शाळा शाळांमधून मुलांची निवड फेरी घेण्यात आली. काही संस्थामधून वेधची सीडी मुलांना आणि शिक्षकांना आणि कर्मचारीवर्गांना दाखवून त्यांना वेध बद्दल माहिती दिली. ह्या सगळ्यातून संस्थेची उद्दिष्टे आणि वेध बद्दल पेणमधे जागृती झाली. **क्षितिज वेध** म्हणजे नक्की

काहीतरी चांगला कार्यक्रम असणार अशी प्रतिमा आमच्याबद्दल पेणमधे इतक्या थोडक्या वेळात निर्माण झालेली दिसते. त्यामागे IPH चे सुनियोजित, हमखास यशस्वी असे कार्यक्रम, आणि त्यांचा विवेकी, प्रगतीशील दृष्टीकोन ह्याचा खूप मोठा हात होता.

ह्या कार्यक्रमांच्या आयोजनाचे धडे आम्हाला अनुभवसमृध्द करून गेले. एखाद्या कार्यक्रमाची जाहिरात कशी करावी, त्यासाठी बजेट कसे ठरवावे, सर्व सदस्यांना कसे जोडून घ्यावे , मुख्य म्हणजे माणसांकडे पैसे कसे मागावे हे सर्व शिकण्याचा हा काळ होता. काय करायला हवे आणि काय करायला नको हेही शिकवणारा! मीटिंग ला उपस्थित न राहणं हा सर्व संघांनाच छळणारा प्रश्न आम्हालाही त्रास देत असे.पण watsapp च्या माध्यमातून ह्या सगळ्यावर आम्ही आमच्यापुरते उत्तर शोधले.

आयपीएच ने कार्यशाळा आयोजित करून इतर ठिकाण च्या वेध teams चा परिचय एकमेकांना करून दिला.कल्याण टीमने सांगितलेली  तिकीटांच्या किमतीची आणि प्रयोजकांच्या हिशेबाची गणितं कुठल्याच पुस्तकात न वाचलेली. तसेच इतर संघांनी त्यांना आलेल्या अडचणी, काढलेले मार्ग याबद्दल सांगितले. त्यातून दिसणारे त्यांचे वेधप्रेम हे खूपच प्रेरक होते. वेध ची तयारी करतानाची सगळ्यात महत्वाची बाब म्हणजे नियोजनाची. कारण 'आयत्या वेळी जमण्यासारखी एकच गोष्ट असते ती म्हणजे फजिती' हे पुलंचे वाक्य सगळ्यांना चांगलेच उमजलेले.  त्या दृष्टीने प्रायोजकांना लिहीण्यासाठीच्या पत्रांपासून ते मुलाखतीतल्या कुठच्या वाक्याला interval चे वडे तळायला घ्यायचे ह्याची संपूर्ण यादी म्हणजे वेध ची blue print जणू! वेधची फॅकल्टि कशी निवडावी, त्यांना कसा संपर्क करावा, सत्रे कशी ठरवावीत, ह्याची सखोल चर्चा. तसेच आणखीन दोन कार्यशाळांचा आमच्या सदस्यांना उपयोग झाला तो म्हणजे दृक श्राव्य तंत्रज्ञांसाठीची एक दिवसीय कार्यशाळा आणि निवेदकांसाठी ची दोन दिवसांची कार्यशाळा.

हया अनुभवांच्या शिदोरीवर आणि IPHच्या भक्कम पाठबळावर आम्ही सारेच आता तयारीला लागलो आहोत. विस्तारलेल्या क्षितिजावर वेधची पावले उमटण्याची आतुरतेने वाट बघत आहोत. आम्हीच नव्हे, तर आमच्याबरोबर इतर पेणकर देखील!

क्षितिज ग्रुप पेण